होमगार्ड संघटनेसंदर्भात विविध प्रलंबित मागण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : एचजीएस २०१९/प्र.क्र.३८/ब/विशा-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०८ मार्च, २०१९

वाचा :- शासन निर्णय क्रमांक बिव्हीपी ०८१८/प्रक्र ९५/पोल-८, दिनांक २८.२.२०१९

प्रस्तावना:-

होमगार्ड स्वयंसेवक हे मानसेवी असल्याने त्यांना कर्तव्यापोटी मानधन दिले जाते. त्यांच्याकडून होणारे मोलाचे कार्य होत असते. होमगार्ड व पोलीस पाटील यांच्या मागण्याबाबत निर्णय घेण्यासाठी मंत्रीमंडळ उपसमिती संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक २८.२.२०१९ अन्वये गठीत करण्यात आली आहे.

शासन निर्णय:-

मंत्रीमंडळ उपसमितीची दिनांक १.३.२०१९ रोजी सहयाद्री अतिथीगृह येथे मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या मंत्रीमंडळ उपसमितीने होमगार्डच्या विविध मागण्या विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत:-

१. शासन निर्णय दिनांक १३/७/२०१० रद्द करण्यात येत आहे.

२. विविध कारणांनी सेवा समाप्त केलेल्या होमगार्डच्या सेवेचा सहाभूतिपूर्वक विचार करुन त्यांना संघटनेत सामावून घेण्यासाठी सशर्त संधी द्यावी शारिरिक पात्रतेच्या कठोर असलेल्या अटी शिथिल करण्यात येत आहेत. जे होमगार्डस पुर्ननोदणीच्या वेळी शारिरीक चाचणी मध्ये अपात्र ठरत असतील त्यांना एक महिन्याचे प्रशिक्षण देऊन होमगार्ड संघटनेत पुन्हा सामावून घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

३. मुंबई होमगार्ड नियम १९५३ मधील नियम ८ नुसार होमगार्डचा संघटनेतील कालावधी ५५ वर्षे आहे. यामध्ये वाढ करुन होमागार्डची कमाल वयोमर्यादा ५५ वर्षावरुन ती ५८ वर्षे करण्याचा तसेच होमगार्डचे वय वर्ष ५० व ५५ वर्षे पूर्ण झाल्यावर त्यांची शारिरीक पात्रता आजमविण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला.

४. होमगार्डचे कार्य सक्षमतेने व सुरळीत होण्यासाठी होमगार्ड अधिनियम व होमगार्ड नियमात आवश्यकती दुरुस्ती / सुधारणा करावी.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०३०९१७३९०११०२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Deepak Vasant Sawant

Digitally signed by Deepak Vasant Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=43cdfecb6fd26ff7b1b970520962ebf72d86546b92151214820b2bb31f3ccac8, serialNumber=66ea8e25496abe127ddbfd3157e10ae5a1fb12e738b63f8a5b2cb92885fd1f05, cn=Deepak Vasant Sawant
Date: 2019.03.09 17:40:23 +05'30'

(दि.व. सावंत)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. मा.राज्यमंत्री (गृह - ग्रामीण) यांचे खाजगी सचिव
३. मा.राज्यमंत्री (गृह -शहरे) यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई.
६. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. महासमादेशक, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
१०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई
११. उपमहासमादेशक,होमगार्ड, मुंबई
१२. सर्व जिल्हा समादेशक, होमगार्ड.
१३. समादेशक, मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, होमगार्ड, घाटकोपर, मुंबई
१४. अधिश्दान व लेखा अधिकारी, मुंबई
१५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१६. वित्त विभाग, (व्यय-८ / अर्थसंकल्प १०), मंत्रालय, मुंबई
१७. निवड नस्ती, विशा-८, गृह विभाग, मंत्रालय,मुंबई.